दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

दिनांक : २८ ऑगस्ट २०२६
वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : पौर्णिमा तिथी (सकाळी ०९:४८ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी नक्षत्र : शततारका नक्षत्र (२९ ऑगस्ट पहाटे ०३:१२ पर्यंत) त्यानंतर पूर्वाभाद्रपदा नक्षत्र योग : अतिगण्ड योग (सकाळी ०७:२७ पर्यंत) त्यानंतर सुकर्मा योग करण : भाव करण (सकाळी ०९:४८ पर्यंत)

### पिस्तुलाची दहशत भारी पडली

**पुणे :** सोशल मीडियावर हातात पिस्तूलासारखे घातक शस्त्र घेऊन रील बनवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न एका तरुणाला चांगलाच महागात पडला आहे. बारामती तालुक्यातील बाबुर्डी येथील प्रेम प्रताप जगताप याच्यावर सुपा पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. सोशल मीडियावरील अशा प्रकारच्या रील्सवर पोलिसांची करडी नजर असून, यापुढे अशा प्रकारचे कृत्य केल्यास कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# ९१ टक्के नावे पुन्हा मतदार यादीत आली, मग आधी वगळली का?

## बंगालच्या एसआरए प्रक्रियेवर गंभीर प्रश्न; 'मतदाराचे नाव हटवणे' इतके सोपे आणि 'मतदानाचा अधिकार परत मिळवणे' इतके कठीण का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (ड्खठ) प्रक्रियेतून वगळण्यात आलेल्या नावांपैकी तब्बल ९१ टक्के नावे अपीलनंतर पुन्हा मतदार यादीत समाविष्ट झाल्याचा दावा समोर आला आहे. माहिती अधिकारातून समोर आलेल्या या आकडेवारीमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर आणि मतदारांच्या अधिकारांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर हजारो मतदारांचे दावे ग्राह्य धरून त्यांची नावे पुन्हा यादीत घ्यावी लागली, तर ही नावे सुरुवातीला कोणत्या निकषांवर वगळण्यात आली होती? हा प्रश्न आता केवळ पश्चिम बंगालपुरता मर्यादित राहिलेला नाही.

उपलब्ध माहितीनुसार, आतापर्यंत ८२,७८२ अपील निकाली काढण्यात आली असून त्यापैकी ७५,४४३ म्हणजे सुमारे ९१ टक्के प्रकरणांत संबंधित मतदारांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करण्यात आली. केवळ ७,४४९ दावे म्हणजे सुमारे ८.८६ टक्के दावे फेटाळण्यात आल्याचे सांगण्यात येते.

ही आकडेवारी खरी असेल, तर तिचा अर्थ अत्यंत गंभीर आहे. मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर चुकीने वगळली गेली होती का? पुनरीक्षणाची प्राथमिक प्रक्रिया पुरेशी काटेकोर नव्हती का? की मतदारांना आपला मतदानाचा अधिकार सिद्ध करण्यासाठी आधी स्वतःच प्रशासनाच्या दारात उभे राहावे लागते?

लोकशाहीत मतदार हा केवळ निवडणुकीच्या दिवशी बोटाला शाई लावणारा नागरिक नाही. मतदानाचा अधिकार हा त्याच्या घटनात्मक लोकशाही सहभागाचा मूलभूत आधार आहे. त्यामुळे एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जात असेल, तर त्यामागे स्पष्ट, पडताळता येणारे आणि पारदर्शक कारण असणे आवश्यक आहे.

९१ टक्क्यांचा आकडा अस्वस्थ करणारा का?

समजा एखाद्या प्रक्रियेतून हजारो नावे वगळली गेली आणि त्यानंतर अपील करणाऱ्यांपैकी ९१ टक्के नागरिकांचे दावे योग्य ठरले. तर स्वाभाविक प्रश्न असा निर्माण होतो की चूक नेमकी कुठे झाली?

निवडणूक आयोगाने केलेली प्राथमिक छाननी चुकीची होती का? स्थानिक पातळीवरील पडताळणीमध्ये त्रुटी राहिल्या का? कागदपत्रे तपासताना निष्काळजीपणा झाला का? की संपूर्ण प्रक्रियेची रचना अशी होती की त्याचा सर्वाधिक फटका सामान्य मतदाराला बसणार होता?

या प्रश्नांची उत्तरे राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा अधिक महत्त्वाची आहेत.

काँग्रेससह विरोधकांनी या आकडेवारीच्या आधारे निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आरोप केले आहेत. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने प्रत्येक प्रकरणाची प्रक्रिया कायदेशीर चौकटीत होत असल्याचे स्पष्ट करणे अपेक्षित आहे. कारण निवडणूक आयोगावरील विश्वास हा कोणत्याही एका पक्षाचा विषय नसून संपूर्ण लोकशाहीचा विषय आहे.

आज बंगाल, उद्या कोणते राज्य?

हा प्रश्न केवळ पश्चिम बंगालमधील मतदारांनी विचारायचा आहे असे नाही. देशातील प्रत्येक राज्यातील सामान्य मतदाराला हा प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे.

### सारांश वृत्त

## जिल्हा परिषद सदस्यांची संख्या वाढली, तब्बल २०१, ग्रामविकास विभागाकडून अधिसूचना जारी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमधील सदस्य संख्या वाढणार आहे. कारण स्वीकृत सदस्यांच्या म्हणजेच नामनिर्देशीत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी ग्रामविकास विभागाकडून अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या अधिसूचनेनंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये मिळून तब्बल १ हजार सदस्यांची भर पडणार आहे. विधासभेत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचाय समिती विधेयक (दुरुस्ती) २०२६ विधेयक पास झाले होते. आता ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेने सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे. जिल्हा परिषदेत एकूण सदस्य संख्येच्या १०% किंवा पाच सदस्य नियुक्त होणार आहेत. तर पंचायत समितीत एकूण सदस्य संख्येच्या २०% किंवा एक सदस्य नियुक्तीला परवानगी आहे.

२०१ नवे जिल्हा परिषद सदस्य : राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये निर्वाचित तब्बल २ हजार २१० सदस्य आहेत. या सदस्यांसोबतच आता नवीन २०१ स्वीकृत सदस्यांनी निवड होणार आहे. तर, पंचायत समितीच्या सदस्यांची संख्या पाहता राज्यभर ८०० पेक्षा अधिक पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य होणार आहेत.

तज्ज्ञ सदस्यांना संधी : राज्यसरकारकडून नेत्यांचे राजकीय पुर्नवसन करण्यासाठी हे प्रयत्न केल्याची टीका करण्यात येत आहे. मात्र, यामध्ये केवळ राजकीय व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळणार असे नाही तर वकील, डॉक्टर, समाजसेवक समाजातील तज्ज्ञ व्यक्तिंना संधी मिळणार आहे.

मतदानाचा अधिकार नाही : स्वीकृत सदस्यांना कामकाजामध्ये मतदान झाले असता मतदानाचा अधिकार नाही. त्यांना जिल्हा परिषद, पंचायत समितीचे अध्यक्षपद, सभापतीपदाची निवडणूक लढणार येणार नाही. जिल्हा परिषदेच्या कार्यकाळा इतकाच यांचा देखील कार्यकाळ असणार आहे.

# मंदार गोंजारींविरोधातील तक्रारीमागचा 'पडद्याआडचा हात' कोणाचा?

## तक्रार झाली, कारवाई झाली; पण तक्रार दाखल करण्याचा निर्णय कुणाच्या सांगण्यावरून? निष्पक्ष चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

पत्रकार मंदार गोंजारी यांच्याशी संबंधित प्रकरणात तक्रार दाखल झाली, कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली; मात्र या संपूर्ण प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेतक्रार दाखल करण्याचा निर्णय नेमका कुणाचा होता? कुणाच्या सांगण्यावरून किंवा दबावामुळे तक्रार करण्यात आली का? या प्रश्नाचे उत्तर समोर येणे लोकशाहीच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाचे आहे.

गोंजारी यांनी विद्यार्थी व सार्वजनिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया घेतल्याचा व्हिडिओ उपलब्ध असल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर त्यांच्याविरोधात तक्रार अथवा गुन्हेगारी कारवाई झाल्याने या प्रकरणाच्या निष्पक्ष तपासाची मागणी गुलाबो गँगच्या संगिता तिवारी आणि झाशीची राणी प्रतिष्ठानच्या अ‍ॅड. रूपाली ठोंबरे-पाटील यांनी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्याकडे निवेदनाद्रे केली आहे.

मात्र केवळ तक्रारीची चौकशी पुरेशी आहे का? तक्रारदार कोण, आरोप काय आणि पुरावे काय याबरोबरच तक्रार करण्यामागील पार्श्वभूमीही तपासली जाणे गरजेचे आहे. तक्रार दाखल करण्यापूर्वी कोणाशी चर्चा झाली? कोणाकडून मार्गदर्शन मिळाले? तक्रार करण्यासाठी कुणी पुढाकार घेतला? कोणाकडे या प्रकरणाचा राजकीय अथवा प्रशासकीय प्रभाव होता का? या प्रश्नांची उत्तरे तपासातून स्पष्ट झाली पाहिजेत. याचा अर्थ कोणत्याही व्यक्तीवर विनाकारण आरोप करणे नव्हे. पुराव्याशिवाय 'पडद्यामागचा सूत्रधार' ठरवणेही चुकीचेच. परंतु तक्रारीची प्रक्रिया जर बाह्य दबाव, प्रभाव किंवा पूर्वनियोजित हेतूने प्रभावित झाली असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. लोकशाहीत पत्रकाराला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि नागरिकालाही पोलिसांकडे तक्रार करण्याचा अधिकार आहे. मात्र दोन्ही अधिकारांचा गैरवापर होऊ नये, यासाठी सत्याची संपूर्ण बाजू तपासली पाहिजे.

म्हणूनच पोलीस प्रशासनाने व्हिडिओ, डिजिटल पुरावे, संबंधितांचे जबाब आणि तक्रारीची संपूर्ण पार्श्वभूमी तपासावी. 'तक्रार कोणी केली?' एवढेच नव्हे, तर 'तक्रार करण्यामागे निर्णय कुणाचा होता?' हा प्रश्नही तपासाचा भाग झाला पाहिजे.

कारण लोकशाहीत पडद्याआड निर्णय घेणाऱ्यांना प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून जनतेचा अधिकार आहे.

# आज निवडणुका झाल्यास भाजपाला फटका, काँग्रेसची मोठी झेप! इंडिया टुडे-सी-व्होटर सर्व्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारला १२ वर्षे पूर्ण होत आली असली तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता कायम असल्याचे पाहायला मिळत आहे. आज देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्या, तर भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) ३२६ जागांसह स्पष्ट बहुमताने पुन्हा सत्तेवर येऊ शकते, असा कौल 'इंडिया टुडे-सी व्होटर'च्या 'मूड ऑफ द नेशन' सर्वेक्षणातून समोर आला आहे. मात्र, जानेवारी महिन्यात झालेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत एनडीएच्या जागांमध्ये घट झाली असून काँग्रेसची कामगिरी उंचावल्याचे चित्र आहे.

जागा घटल्या, तरी बहुमत भक्कम

ऑगस्ट २०२६ च्या या सर्वेक्षणाअनुसार, एनडीएला ३२६ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात एनडीएला ३५२ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. म्हणजेच गेल्या सहा महिन्यांत एनडीएच्या २६ जागा कमी झाल्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने दिलेल्या '४०० पार'च्या घोषणेपासून हा आकडा दूर असला, तरी मतदारांचा एनडीएवरील विश्वास अजूनही कायम असल्याचे स्पष्ट होते.

दुसरीकडे, विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीला या सर्वेक्षणात फार मोठा फायदा होताना दिसत नाही. 'इंडिया' आघाडीला १८५ जागा मिळतील असा अंदाज आहे. जानेवारी २०२६ मधील सर्वेक्षणात हा आकडा १८२ होता. २०२४ च्या निवडणुकीत 'इंडिया' आघाडीने २३४ जागा जिंकत एनडीएला कडवी झुंज दिली होती, त्या तुलनेत आघाडीची कामगिरी घसरल्याचे दिसते.

पक्षांनुसार आकडेवारी पाहिल्यास भाजप आणि काँग्रेसच्या आलेखात मोठा बदल दिसतो:

भाजपा : आज निवडणुका झाल्यास भाजपाला स्वबळावर २६१ जागा मिळू शकतात. जानेवारी २०२६ मध्ये हा अंदाज २८७ जागांचा होता.

म्हणजेच भाजप बहुमताच्या २७२ या जादुई आकड्याच्या खाली आला आहे. तरीही २०२४ मध्ये जिंकलेल्या २४० जागांपेक्षा ही संख्या जास्त आहे. पेपरफुटीचे प्रकरण आणि शिक्षण क्षेत्रातील गोंधळामुळे तरुण वर्ग (ऋशप न) नाराज असल्याचा फटका भाजपाला बसल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

काँग्रेस: राहुल गांधी यांच्या आक्रमक रणनीतीमुळे काँग्रेसचा आलेख सुधारताना दिसत आहे. ताज्या सर्वेक्षणानुसार काँग्रेसला १०६ जागा मिळण्याचा अंदाज आहे. जानेवारी महिन्यात काँग्रेसला केवळ ८० जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. महिला आरक्षण आणि विद्यार्थी आंदोलनावरील पोलीस कारवाई यांसारख्या मुद्द्यांवरून काँग्रेसने निर्माण केलेल्या वातावरणाचा फायदा पक्षाला होताना दिसत आहे.

# न्यायाच्या मंदिरातच न्यायव्यवस्थेवर गंभीर आरोप! सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचं पत्र, सरन्यायाधीश म्हणाले माध्यमांतून न्याय होणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाच्या न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता ही केवळ निकालांवर नाही, तर न्यायव्यवस्थेतील अंतर्गत पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्वावरही अवलंबून असते. पण आता राजस्थान उच्च न्यायालयाच्या कार्यवाहक मुख्य न्यायाधीशांविरोधात थेट सर्वोच्च न्यायालयातील विद्यमान न्यायमूर्तींनी गंभीर तक्रारी केल्याने न्यायव्यवस्थेच्या अंतर्गत कारभारावरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी राजस्थान उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव प्रकाश शर्मा यांच्या कार्यपद्धतीबाबत भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांना तीन पत्रे लिहिली. ही पत्रे अनुक्रमे २ ऑगस्ट, १० ऑगस्ट आणि १७ ऑगस्ट २०२६ रोजी पाठवण्यात आली. या पत्रांमध्ये न्यायमूर्ती मेहता यांनी गंभीर गैरव्यवस्थापन, कथित गैरप्रकार, पक्षपात आणि अधिकारांच्या गैरवापराबाबत चिंता व्यक्त केली असून, राजस्थान उच्च न्यायालयाला बाहेरील उच्च न्यायालयातील नियमित मुख्य न्यायाधीश देण्याची मागणी केली आहे.

विशेष म्हणजे, ही तक्रार एखाद्या बाहेरील व्यक्तीने किंवा वकिलांच्या संघटनेने केलेली नाही. राजस्थान उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि सध्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असलेल्या संदीप मेहता यांनीच आपल्या मूळ उच्च न्यायालयाच्या कार्यवाहक मुख्य न्यायाधीशांविरोधात ही गंभीर भूमिका घेतली आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढते.

मात्र २६ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी या वादावर महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, न्यायमूर्ती मेहता यांनी उपस्थित केलेल्या चिंतांची दखल घेण्यात आली असून, या प्रकरणाची योग्य पातळीवर तपासणी सुरू आहे. मात्र विद्यमान न्यायाधीशांविरोधातील आरोप माध्यमांमधील दावे किंवा परस्परविरोधी वक्तव्यांच्या आधारे ठरवले जाऊ शकत नाहीत. संबंधित न्यायाधीशांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी दिल्याशिवाय कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. ही भूमिका एका अर्थाने न्यायाच्या मूलभूत तत्त्वाशी सुसंगत आहेआरोप म्हणजे दोषसिद्धी नव्हे. न्यायमूर्ती शर्मांविरोधातील आरोप अद्याप सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे माध्यमांमध्ये आलेल्या पत्रांना अंतिम सत्य मानणेही योग्य नाही. पण दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयातील एका न्यायमूर्तीनेच इतक्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी केल्या आहेत, ही बाब दुर्लक्षित करूनही चालणार नाही.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की अशा तक्रारींचा निर्णय माध्यमांमधील आरोप-प्रत्यारोपांच्या आधारे होऊ शकत नाही. न्यायव्यवस्थेतील संस्थात्मक प्रक्रियेतूनच या प्रकरणाचा विचार केला जाईल. राजस्थान उच्च न्यायालयासाठी नियमित मुख्य न्यायाधीश नियुक्त करण्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाचे न्यायवृंद पुढे नेत असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, कार्यवाहक मुख्य न्यायाधीश संजीव प्रकाश शर्मा २६ सप्टेंबर २०२६ रोजी निवृत्त होणार आहेत.

पण या संपूर्ण प्रकरणातून सर्वात मोठा प्रश्न समोर येतो तो म्हणजेन्यायव्यवस्थेतील अंतर्गत तक्रारींचे निवारण किती पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने होते?

न्यायालय नागरिकांना निष्पक्षतेचा धडा देते. मग न्यायालयाच्या आतच एखाद्या न्यायमूर्तीला आपल्या सहकाऱ्याविरोधात गंभीर तक्रार करावी लागते, तेव्हा त्या तक्रारींची सत्यता तपासण्याची प्रक्रिया जनतेच्या विश्वासाला समाधान देणारी असणे गरजेचे आहे.

माध्यमांमध्ये न्याय होऊ नये, हे निश्चितच योग्य. पण न्यायव्यवस्थेच्या बंद दारांआडही प्रश्न दडपले जाऊ नयेत. कारण न्यायालयावरील विश्वास हा फक्त न्यायाधीशांच्या निर्णयांवर नाही, तर न्यायाधीशांच्या संस्थात्मक उत्तरदायित्वावरही टिकून असतो.

या प्रकरणात आरोप खरे की खोटे, याचा निर्णय संस्थात्मक चौकशीनंतरच होईल. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहेन्यायाच्या मंदिरातही पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि आत्मपरीक्षणाची गरज तितकीच आहे. .

# ट्रम्प-मोदींच्या सत्ताकारणाचा सोशल मीडियावरही 'डिजिटल पहारा'?

## मुलांच्या सुरक्षेच्या नावाखाली निर्बंध योग्य; पण डिजिटल नियंत्रणाचा वापर राजकीय फायद्यासाठी होणार नाही ना?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

अमेरिकेत अल्पवयीन मुलांच्या फेसबुक आणि इन्स्टाग्राम वापरावर रात्रीच्या वेळेत निर्बंध, स्क्रीन टाइमवर मर्यादा, नोटिफिकेशन्सवर नियंत्रण आणि 'लाईक्स-रिॲक्शन्स' लपवण्यासारख्या उपाययोजना करण्याच्या दिशेने मेटाने पाऊल टाकल्याची माहिती समोर आली आहे. मुलांना सोशल मीडियाच्या व्यसनापासून वाचवणे, मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम कमी करणे आणि पालकांचे नियंत्रण वाढवणे या उद्देशांनी हे नियम समर्थनीय वाटू शकतात. मात्र या निर्णयाकडे केवळ 'चाइल्ड सेफ्टी' म्हणून पाहणे पुरेसे आहे का, हा प्रश्नही विचारला पाहिजे.

कारण आज जगात सोशल मीडिया हा केवळ मनोरंजनाचा विषय राहिलेला नाही. तो राजकीय प्रचार, जनमतनिर्मिती, आंदोलन, विरोध आणि सत्तेच्या समर्थनाचे सर्वांत प्रभावी माध्यम बनला आहे. अशा परिस्थितीत डिजिटल प्लॅटफॉर्मवरील नियंत्रणाची ताकद नेमकी कोणाच्या हातात आहे, हा प्रश्न अधिक गंभीर ठरतो.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ॆपरश्रव ढ्ऱ्राा आणि भारताचे पंतप्रधान छरॲशपवॲर चेवळ यांच्यातील राजकीय जवळीक आणि सोशल मीडिया-आधारित राजकारणाची दोन्ही देशांतील वाढती भूमिका पाहता, एक धोकादायक कल्पना मनात येतेसत्ताधाऱ्यांना आपल्या बाजूने जनमत ठेवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मवर अधिक नियंत्रण हवे आहे का?

याचा थेट पुरावा नसताना मेटाचा निर्णय ट्रम्प-मोदी यांच्यातील मैत्रीचा परिणाम आहे, असा दावा करणे चुकीचे ठरेल. परंतु प्रश्न विचारण्यास लोकशाहीत कोणतीही मनाई नाही. विशेषतः जेव्हा सोशल मीडिया कंपन्या आणि सरकारे यांच्यातील संबंध, कंटेंट मॉडरेशन आणि ऑनलाइन राजकीय प्रभाव याबाबत जगभरात चर्चा सुरू आहे.

मुलांना रात्री सोशल मीडियापासून दूर ठेवणे निश्चितच स्वागतार्ह ठरू शकते. पण उद्याचा प्रश्न असा असेल तर?'आज मुलांसाठी लागू झालेले डिजिटल नियंत्रण उद्या प्रौढ नागरिकांच्या राजकीय अभिव्यक्तीवरही लागू होईल का?

आज 'स्क्रीन टाइम' दोन तास. उद्या राजकीय कंटेंटसाठी मर्यादा? आज नोटिफिकेशन बंद. उद्या सरकारविरोधी पोस्टचा पोहोच कमी? आज 'लाईक्स' लपवणे. उद्या जनमताचा खरा अंदाजच नागरिकांपासून लपवणे?

ही भीती काल्पनिक असली तरी तिच्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

मुलांचे संरक्षण आणि नागरिकांचे स्वातंत्र्य यामध्ये स्पष्ट सीमा असली पाहिजे. पालक नियंत्रणाच्या नावाखाली कंपन्यांना वाढते अधिकार मिळत असतील, तर त्यांची पारदर्शकता, स्वतंत्र देखरेख आणि जबाबदारीही तितकीच आवश्यक आहे.

लोकशाहीची खरी परीक्षा सोशल मीडिया किती नियंत्रित करता येतो यात नाही; तर सत्तेला न आवडणारा आवाज किती मोकळेपणाने ऐकू दिला जातो यात आहे.

म्हणूनच मेटाच्या नव्या नियमांचे स्वागत करण्यापूर्वी एक प्रश्न विचारायलाच हवा ही डिजिटल सुरक्षा मुलांसाठी आहे, की भविष्यातील डिजिटल समाजावर नियंत्रण ठेवण्याची नवी प्रयोगशाळा?

## संपादकीय

### आजही व्यवस्था मागते एकलव्याचा अंगठा!

महाभारतातील द्रोणाचार्यांनी एकलव्याकडून गुरुदक्षिणा म्हणून त्याचा अंगठा मागितला. त्या एका मागणीने एकलव्याची धनुर्विद्येची क्षमता कायमची खुंटली. हजारो वर्षांनंतरही त्या कथेचा संदर्भ संपलेला नाही. कारण आजही व्यवस्था आपल्या सोयीच्या नियमांच्या नावाखाली वंचितांच्या हातातील संधी हिरावून घेताना दिसते. महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शासकीय व अनुदानित वसतिगृहातील प्रवेशासाठी लादलेल्या वयोमर्यादेचा वाद हा त्याच मानसिकतेचा आधुनिक अवतार म्हणावा लागेल. प्रश्न एवढाच आजच्या व्यवस्थेतील द्रोणाचार्य कोण आणि आजचे एकलव्य कोण?

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहण्याची वयोमर्यादा सरकारने सुरुवातीला २५ वर्षे निश्चित केली. विरोधाचा आवाज वाढल्यानंतर १४ ऑगस्ट २०२६ रोजी ती ३० वर्षे करण्यात आली. पण प्रश्न सुटला नाही. कारण अन्यायाची उंची पाच वर्षांनी वाढवून किंवा कमी करून न्याय निर्माण होत नाही. ज्यांच्या शैक्षणिक प्रवासालाच सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक अडथळ्यांनी उशीर लावला, त्यांच्या शिक्षणासाठी अशी कृत्रिम वयोमर्यादा ठरविणे हे वास्तवाकडे डोळेझाक करण्यासारखे आहे.

७ मे २०२६ च्या शासन निर्णयानंतर पुणे, नागपूर आणि अन्य ठिकाणी आदिवासी विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. त्यांचा प्रश्न केवळ वसतिगृहाचा नाही; तो शिक्षणाच्या समान संधीचा आहे. दुर्गम डोंगराळ भागात शाळा-कॉलेजपर्यंत पोहोचण्यासाठीच अनेक मुलांना संघर्ष करावा लागतो. माहितीचा अभाव, वाहतुकीची कमतरता, आर्थिक अडचणी आणि कौटुंबिक परिस्थिती यामुळे त्यांचे शिक्षण अनेकदा उशिरा सुरू होते. अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने हात द्यायचा की त्यांच्या पायात आणखी बेड्या घालायच्या?

विशेष म्हणजे, एकीकडे नोकरीच्या संधींसाठी वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत असू शकते आणि दुसरीकडे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी वसतिगृहाची दारे २५ किंवा ३० वर्षांनंतर बंद केली जातात. हा विरोधाभास सरकारच्या धोरणकर्त्यांना दिसत नाही का? रोजगारासाठी उशिरा संधी मिळू शकते, पण शिक्षणासाठी उशीर झाला तर त्याला शिक्षा का? शिक्षण ही मूलभूत गरज आहे की सरकारी कार्यालयातील एखाद्या फाईलवरच्या अटींचा विषय?

या निर्णयाला विरोध वाढल्यानंतर हा मुद्दा राजकीय पातळीवरही पोहोचला. पुण्यातील 'छात्रों की गूंज' कार्यक्रमातून राहुल गांधी यांनी हा प्रश्न उपस्थित केला आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले. राष्ट्रीय पातळीवर विषय गाजल्यानंतर सरकारला वयोमर्यादेच्या निर्णयाला स्थगिती देण्याची वेळ आली. मग प्रश्न असा निर्माण होतो की, विद्यार्थ्यांचा आक्रोश सरकारला आधी का ऐकू आला नाही? आंदोलन, राजकीय दबाव आणि राष्ट्रीय चर्चा झाल्यानंतरच प्रशासनाला सामाजिक न्यायाची जाणीव होते का?

याहून गंभीर बाब म्हणजे वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर मोर्चे काढू नयेत, संघटना बांधू नयेत, माध्यमांशी बोलू नये अशा स्वरूपाच्या अटी लादल्या गेल्याची चर्चा आहे. जर विद्यार्थी सरकारी वसतिगृहात राहतो म्हणून त्याचा आवाजही सरकारच्या परवानगीवर अवलंबून असेल, तर ही लोकशाहीची कोणती व्याख्या? वसतिगृह हे विद्यार्थ्याला शिक्षण देणारे आश्रयस्थान असावे; त्याला गप्प करणारे प्रशासनिक छावणीस्थान नव्हे.

देवेंद्र फडणवीस स्वतःला द्रोणाचार्य समजतात का आणि आदिवासी विद्यार्थ्यांकडून आधुनिक 'गुरुदक्षिणा' म्हणून त्यांचा अधिकार, आवाज आणि संधीचा अंगठा मागतात का, हा प्रश्न आज विचारला पाहिजे. व्यक्तीवर टीका करण्यापेक्षा येथे महत्त्वाचे आहे ते सत्तेचे मानसिकतेचे परीक्षण. सरकार कोणाचेही असो जर धोरणांचा परिणाम असा होत असेल की वंचित विद्यार्थ्यांची प्रगती थांबते, तर त्या धोरणांना प्रश्न विचारणे अपरिहार्य आहे.

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे हा सरकारचा उपकार नाही; ते राज्याचे घटनात्मक आणि सामाजिक कर्तव्य आहे. त्यामुळे शिक्षणाच्या वाटेवर अटींचे काटे पेरण्याऐवजी शासनाने त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. वयोमर्यादा, निवासाच्या अटी किंवा अभिव्यक्तीवरची बंधने या प्रत्येक निर्णयाची कसोटी एका प्रश्नावर झाली पाहिजे : यामुळे आदिवासी विद्यार्थ्याला पुढे जाण्याची संधी मिळते की तो पुन्हा एकदा एकलव्य बनतो?

महाभारतात एकलव्याचा अंगठा कापला गेला; आजच्या लोकशाहीत तो अंगठा कापण्याची गरज नाही. नियमांची अशी रचना करा की त्याच्या हातातील संधीच निसटेल इतके पुरेसे आहे. म्हणूनच सरकारने द्रोणाचार्याची भूमिका सोडून राज्यकर्त्याची भूमिका स्वीकारण्याची वेळ आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांकडून गुरुदक्षिणा मागू नका; त्यांच्या हातात शिक्षणाचे धनुष्य द्या, संधीचा बाण द्या आणि त्यांना स्वतःचे लक्ष्य गाठू द्या.

# पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना पेन्शनचा मार्ग मोकळा; सहा महिन्यांत लाभ देण्याचे निर्देश

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) हजारो कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य शासनाच्या नियमांप्रमाणे पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचे (पेन्शन) लाभ देण्याचा मार्ग मोकळा झाला असून, संबंधित कर्मचाऱ्यांना येत्या सहा महिन्यांत पेन्शनचे सर्व लाभ अदा करावेत, असे निर्देश पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती तथा पीएमपीएमएलचे संचालक अभिषेक बारणे यांनी प्रशासनाला दिले आहेत.

या प्रश्नावर कर्मचाऱ्यांनी तब्बल २९ वर्षे कायदेशीर लढा दिला. उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने दिलेल्या निकालाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी आता पुढे आली आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळापासून पेन्शनच्या प्रतीक्षेत असलेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

**प्रशासनाला कडक सूचना**

या प्रकरणात बारणे यांनी पुढाकार घेत पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (उचृ) यांना अधिकृत पत्र पाठविले आहे. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ५६२७/२०१३ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, संबंधित कर्मचाऱ्यांना विहित सहा महिन्यांच्या कालावधीत निवृत्ती वेतनाचे लाभ देण्यासाठी आवश्यक ती नियमाधीन कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना कोणतीही दिरंगाई होऊ नये आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कापासून पुन्हा वंचित ठेवले जाऊ नये, याची दक्षता घेण्याचेही बारणे यांनी प्रशासनाला बजावले आहे.



**२९ वर्षांच्या संघर्षाला यश**

पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचे लाभ मिळत असताना पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना मात्र या सुविधेपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे निवृत्तीनंतर अनेक कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

या हक्कासाठी कर्मचाऱ्यांनी तब्बल २९ वर्षे संघर्ष केला. अखेर २ मे २०१३ रोजी औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्याचे आदेश दिले. या निर्णयाविरोधात पीएमपीएमएल प्रशासनाने उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रक्रियेनंतर कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय झाल्याने त्यांच्या दीर्घकाळच्या लढ्याला महत्त्वाचे यश मिळाले.

आता न्यायालयीन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष पेन्शनचा लाभ मिळण्याची प्रतीक्षा कर्मचाऱ्यांना आहे. प्रशासनाने सहा महिन्यांच्या मुदतीत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून निवृत्त तसेच पात्र कर्मचाऱ्यांना त्यांचे सर्व वैधानिक लाभ द्यावेत, अशी मागणी होत आहे.

**निवृत्त कर्मचाऱ्यांकडून आभार**

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पेन्शनच्या प्रश्नासाठी पाठपुरावा केल्याबद्दल निवृत्त कर्मचाऱ्यांनी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांचे आभार मानले. २९ वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेल्या न्यायालयीन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यास अनेक निवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे.

# वडार समाजाचा 'संकल्प मेळावा' भोसरीत

## जातीच्या दाखल्याची अट शिथिल करा, महामंडळाकडून विनाअट कर्ज द्या; ३० ऑगस्टला समाजबांधवांची उपस्थिती

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

वडार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या वतीने पिंपरी-चिंचवडमध्ये ३० ऑगस्ट रोजी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. क्वालिटी सर्कल फोरम, टेल्को रोड, भोसरी येथे सकाळी ११ वाजता हा मेळावा होणार आहे.

वडार समाजाच्या जातीच्या दाखल्यासाठी असलेली १९६१ सालच्या पुराव्याची अट शिथिल करावी, तसेच बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार आणि लघुउद्योग सुरू करण्यासाठी संबंधित विकास महामंडळाकडून विनाअट कर्ज उपलब्ध करून द्यावे, या प्रमुख मागण्या मेळाव्यात मांडण्यात येणार आहेत.

याशिवाय समाजातील कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध करून देणे, बार्टी आणि आर्टीच्या धर्तीवर 'शूरवीर हरबा वडार रिसर्च अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट' स्थापन करणे, भूमिहीन कुटुंबांना उपजीविकेसाठी जमीन उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना स्वस्त धान्य दुकाने देणे, रॉयल्टीच्या मर्यादेत वाढ व सवलत देणे, तसेच दगडखाण कामगार आणि बांधकाम क्षेत्राशी संबंधित घटकांना शासकीय व निमशासकीय बांधकाम कामांमध्ये संधी मिळावी, अशा विविध मागण्यांवर चर्चा होणार आहे.

या संकल्प मेळाव्याला 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नवी मुंबई महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. पुणे जिल्ह्याच्या पूर्वतयारीची जबाबदारी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे यांच्याकडे आहे.

वडार समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी केवळ निवेदने न देता संघटितपणे पाठपुरावा करून त्या शासनाकडून मंजूर करून घेण्याचा निर्धार या मेळाव्यात करण्यात येणार आहे. तसेच समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा 'वडार समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या मेळाव्यातून वडार समाजाच्या पुढील आंदोलनाची दिशा निश्चित होणार असून, महाराष्ट्रातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# २५ सोसायट्यांतील हजारावर नागरिक महापालिकेविरोधात आंदोलनाच्या तयारीत

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**किवळे-रावेत-मामुर्डी : प्रतिनिधी**

किवळे, रावेत आणि मामुर्डी परिसरातील प्रलंबित नागरी समस्यांकडे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २५ हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांमधील नागरिक आंदोलनाच्या तयारीत आहेत. या आंदोलनात परिसरातील सुमारे एक हजारांहून अधिक नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती नागरिकांनी दिली.

परिसरातील विविध नागरी प्रश्न गेल्या काही काळापासून प्रलंबित असून, त्याबाबत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित तोडगा निघत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. त्यामुळे आता प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्याचा निर्णय नागरिकांनी घेतला आहे.

किवळे, रावेत आणि मामुर्डी परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभारले गेले असून, त्यानुसार नागरी सुविधांवरही मोठा ताण निर्माण झाला आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पायाभूत सुविधा पुरेशा नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. परिणामी दैनंदिन जीवनात नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या प्रश्नांवर महापालिका प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

दरम्यान, आंदोलनाची निश्चित तारीख, ठिकाण तसेच कोणत्या विशिष्ट नागरी प्रश्नांवर आंदोलन करण्यात येणार आहे, याबाबत नागरिकांकडून लवकरच अधिकृत माहिती जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

# बहिणाबाई चौधरी सर्प उद्यान तात्काळ सुरू करा; तुषार हिंगे यांची मागणी

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**चिंचवड : प्रतिनिधी**

चिंचवड येथील प्रसिद्ध निसर्गकवी बहिणाबाई चौधरी सर्प उद्यान व प्राणिसंग्रहालय गेल्या अनेक वर्षांपासून नूतनीकरणाच्या कामामुळे बंद आहे. हे महत्त्वाचे शैक्षणिक, पर्यावरणविषयक आणि मनोरंजनाचे केंद्र नागरिकांसाठी तात्काळ खुले करावे, अशी मागणी माजी उपमहापौर व स्थानिक नगरसेवक तुषार हिंगे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

प्राणिसंग्रहालय बंद असल्याने परिसरातील नागरिक, लहान मुले, विद्यार्थी तसेच पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरणाची प्रत्यक्ष माहिती मिळण्यासाठी हे महत्त्वाचे केंद्र होते. मात्र, प्रशासकीय दिरंगाई आणि नूतनीकरणाच्या कामाला अपेक्षित गती न मिळाल्याने हे उद्यान मागील सुमारे दहा वर्षांपासून नागरिकांसाठी बंद आहे.

# तडीपार गुंडाची पिंपरीत दहशत; धारदार कोयत्यासह मुसक्या आवळल्या

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पुणे । प्रतिनिधी**

ठिकाण: हिंदुस्थान अँटिबायोटिक (क्ळ) कंपनीचे मैदान, महादेव मंदिराजवळ, पिंपरी

पोलीस ठाणे: संत तुकारामनगर पोलीस ठाणे

कारवाई: पिंपरी-चिंचवड व पुणे शहर-जिल्ह्यातून १ वर्षासाठी तडीपार केलेला आरोपी तौसिफ अब्दुल हाफिज चौधरी (वय २३, रा. लालटोपीनगर, पिंपरी) हा कोणत्याही परवानगीशिवाय शहरात आला होता. तो धारदार लोखंडी कोयता बाळगून गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याला रंगेहात पकडून बेड्या ठोकल्या. त्याच्यावर हत्यार कायदा व तडीपारी आदेश भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**रावेतमध्ये गांजा विक्रीचा डाव उधळला; तरुणाला बेड्या**

ठिकाण: सावित्री कॉर्नर चौक ते भोंडवे पेट्रोल पंप जाणारा कच्चा रस्ता, रावेत

पोलीस ठाणे: रावेत पोलीस ठाणे

कारवाई: रावेत परिसरात अंमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री होणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचला. आरोपी साहील राहुल चोरे (वय २१, रा. एस.बी. पाटील कॉलेजजवळ, रावेत) याच्याकडून २७,३५०/- रुपये किमतीचा ५४७ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्ध छ्ृझड ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

**नेहरूनगरमधून पल्सर लांबवणारा कर्नाटकचा चोरटा गजाआड**

ठिकाण: तवक्कल मशीद परिसर, नेहरूनगर (पिंपरी)

पोलीस ठाणे: संत तुकारामनगर पोलीस ठाणे




कारवाई: अमीन बापासाहेब शेख यांची २५,००० रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल (चक १४ क्ङ ७१४०) अज्ञात व्यक्तीने लबाडीच्या इराद्याने चोरून नेली होती. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने तपास करत आरोपी आदित्य लोकेश कुमार (वय २१, रा. रायचूर, कर्नाटक) याला अटक करून चोरीची दुचाकी हस्तगत केली आहे.

**सोमाटणे येथील हॉटेलमधून महिलेची पर्स लंपास; ९० हजारांचे सोन्याचे दागिने व रोकड चोरीला**

ठिकाण: राजधानी स्वीट, सोमाटणे (ता. मावळ)

पोलीस ठाणे: तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे

घटना: नाश्ता करण्यासाठी आलेल्या एका महिला तक्रारदारांची पर्स हॉटेलमध्ये विसरून राहिली असता, अज्ञात चोरट्याने ती पर्स चोरून नेली. या पर्समध्ये सुमारे ९०,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोकड व मोबाईल असा ऐवज होता. याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांत अज्ञात चोरावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**म्हाळुंगे कमानीजवळ भरधाव ट्रकची दुचाकीला धडक; महिला गंभीर जखमी**

ठिकाण: म्हाळुंगे कमान, चाकण-तळेगाव रोड (ता. खेड)

पोलीस ठाणे: म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे

घटना: सिग्नलवर थांबलेल्या स्टार सिटी दुचाकीला (चक १४ ऋध ६८५०) पाठीमागून येणाऱ्या भरधाव टाटा ११०९ ट्रकने (चक०४ एइ १६२५) जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार महिला गंभीर जखमी झाली असून तिच्या उजव्या पायाच्या पोटरीला १५ टाके पडले आहेत. अपघातानंतर वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून पसार झालेल्या अज्ञात ट्रक चालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**१. जुना मुंबई-पुणे हायवेवर आयशर टेम्पोच्या धडकेत कारचे नुकसान; चालकावर गुन्हा**

ठिकाण: सेंट्रल चौकाजवळ (देहूरोड ते तळेगाव दाभाडे रोड)

पोलीस ठाणे: देहूरोड पोलीस ठाणे

घटना: गौरव सुनिल शेळके (वय २३, रा. बेबडओहोळ, मावळ) हे जुना पुणे-मुंबई हायवेवरून आपल्या स्विफ्ट डिझायर (चक १४ छए ८८८२) कारने जात असताना, भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने (चक०४ घऋ७०९३) कारला जोरदार धडक दिली. या अपघातात कारचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून टेम्पो चालक अरुण अंबादार नंजिरे (वय ३०, रा. रबाळे, नवी मुंबई) याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### दौंड बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. भूषण दिवेकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुका ॲडव्होकेट बार असोसिएशनची सन २०२६-२७ या वर्षासाठीची वार्षिक निवडणूक २४ ऑगस्ट रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी ॲड. भूषण राजाराम दिवेकर याची बहुमताने निवड करण्यात आली.

निवडणुकीनंतर ॲड. दिवेकर यांचे बार असोसिएशनच्या सदस्यांनी अभिनंदन केले. त्यांच्या निवडीमुळे बार असोसिएशनच्या आगामी कार्यकाळात वकिलांच्या विविध प्रश्नांना तसेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित बाबींना अधिक प्रभावीपणे हाताळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

वार्षिक निवडणूक शांततापूर्ण आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडल्याने सदस्यांनी समाधान व्यक्त केले. नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. भूषण दिवेकर यांनी बार असोसिएशनच्या हितासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. निवडीनंतर बार असोसिएशनच्या सदस्यांनी ॲड. दिवेकर यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# नेहरू विद्यालयातील मुलींनी जवानांसाठी बनविल्या आकर्षक राख्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार केल्या.

विद्यार्थिनींनी विविध रंगांच्या व आकर्षक सजावटीच्या राख्या तयार करून त्या देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांना पाठविण्याचा उपक्रम राबविला. देशाच्या रक्षणासाठी कुटुंबापासून दूर राहून सेवा बजावणाऱ्या सैनिकांशी भावनिक नाते निर्माण व्हावे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक



बांधिलकीची भावना वाढावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे प्राचार्य कांताराम टाव्हरे व पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी सांगितले. या उपक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. राख्या तयार करताना त्यांनी जवानांविषयी आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. 'देशाच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या जवानांना आमच्या प्रेमाची आणि शुभेच्छांची ही राखी,' अशा भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केल्या.

या उपक्रमासाठी प्रा. कल्पना चव्हाण-माखरे व प्रा. श्वेता डोके-कानडे यांनी विशेष सहकार्य केले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील, खजिनदार प्रकाश तापकीर आणि संचालक सुनील वळसे पाटील यांनी शिक्षक व विद्यार्थिनींचे कौतुक केले.

जवानांना राख्या पाठवून रक्षाबंधनाचा सण देशसेवेच्या भावनेशी जोडण्याचा विद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजविणारा आणि समाजासाठी प्रेरणादायी ठरला.

## आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बाजरी फुलोऱ्यात; शेतकरी सुखावला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळेवाडी परिसरात यंदा पावसाने चांगली हजेरी लावल्याने पावसाळी बाजरीचे पीक फुलोऱ्यात आले आहे. बाजरीची पिके जोमाने वाढल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.



यंदा पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पावसाळी बाजरीची लागवड केली आहे. बाजरी हे महत्त्वाचे धान्यपीक असून त्याचा मानवी आहारात उपयोग केला जातो. तसेच बाजरीच्या ताटाचा जनावरांसाठी चारा म्हणूनही मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.

त्यामुळे बाजरीच्या पिकाला शेतकऱ्यांच्या दृष्टीने दुहेरी महत्त्व आहे.

सध्या बाजरीचे पीक चांगलेच बहरले असून अनेक शेतांमध्ये बाजरी फुलोऱ्यात आली आहे. मात्र, पीक बहरात येताच पाखरांचा उपद्रव वाढण्याची शक्यता असल्याने शेतकरी पिकाच्या राखणीसाठी शेतात पहारा देताना दिसत आहेत. पाखरांनी बाजरीचा फडशा पाडू नये, यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करत आहेत.

पावसाची साथ आणि पिकाची झालेली चांगली वाढ पाहता यंदा बाजरीचे उत्पादन समाधानकारक होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

## लोणी-धामणी परिसरात शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत; खरीप पिकांवर संकटाचे सावट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे, वडगावपीर आणि मांदळेवाडी या दुष्काळग्रस्त परिसरात जून ते जुलैअखेर पावसाने चांगली हजेरी लावली. मात्र, ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आता आकाशाकडे लागल्या आहेत.

पावसाळा सुरू होऊनही ऑगस्टमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या परिसरात ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी तुरळक सरी वगळता दमदार पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जून-जुलैमध्ये झालेल्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. सुरुवातीला पिकांची वाढ समाधानकारक होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे पिकांना सध्या पाण्याची गरज भासत आहे.

विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या या दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ऑगस्टमधील पावसाची मोठी अपेक्षा होती. मात्र, पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील उत्पादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

येत्या काही दिवसांत दमदार पाऊस झाला तर पिकांना मोठा आधार मिळू शकतो. मात्र, पावसाने आणखी दडी मारल्यास खरीप पिकांना फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे लोणी-धामणी परिसरात वरुणराजाच्या कृपेकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले असून, लवकरच समाधानकारक पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आहुपे-कोंढवळ खोऱ्यात श्रावण सरींसोबत निसर्गसौंदर्याची उधळण

### धुक्याने वेढलेल्या दऱ्या, गर्द वनराई अन् हिरवाईने नटलेला सह्याद्री; पर्यटकांसह भाविकांचीही वाढली गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील आहुपे-कोंढवळ खोऱ्याला सध्या श्रावण सरींमुळे निसर्गसौंदर्याचे अनोखे रूप प्राप्त झाले आहे. गर्द वनराई, धुक्याने भरलेल्या दऱ्या, हिरव्यागार सह्याद्रीच्या पर्वतरांगा आणि वळणावळणांचे रस्ते यामुळे संपूर्ण परिसर पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. पावसाळी वातावरणाचा आणि निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी या भागात पर्यटकांची गर्दी वाढली आहे.



आहुपे-कोंढवळ खोऱ्यासोबतच श्रीक्षेत्र भीमाशंकर, भीमा नदीचे उगमस्थान, गुप्त भीमाशंकर, साक्षी विनायक मंदिर, कमलजादेवी मंदिर आणि हनुमान तळे या धार्मिक स्थळांकडेही भाविकांचा ओघ वाढला आहे. श्रावण महिन्यामुळे श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी हजारो भाविक येत आहेत. त्यामुळे निसर्ग आणि धार्मिक पर्यटनाचा अनोखा संगम या परिसरात पाहायला मिळत आहे.

पावसाळ्यात आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यात निसर्गाने मुक्तहस्ताने सौंदर्याची उधळण केली आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा, सदाहरित जंगल, समृद्ध जैवविविधता, विविध वन्यजीव आणि आशिया खंडातील वैशिष्ट्यपूर्ण शेकरू खार यामुळे हा परिसर निसर्गप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

डिंभे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील सुमारे ३० किलोमीटरचा रिंग रोड विकसित झाल्यास तो भविष्यातील पर्यटनासाठी मोठे आकर्षण ठरू शकतो. मात्र अरुंद रस्ते, धोकादायक वळणे, मोबाईल नेटवर्कचा अभाव, सुरक्षा उपाययोजनांची कमतरता आणि अपुरी एसटी बस सेवा या समस्या अद्याप कायम आहेत.

शासनाने पर्यटनाच्या दृष्टीने या भागातील पायाभूत सुविधांकडे लक्ष दिल्यास स्थानिक आदिवासी युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. होम-स्टे, स्थानिक खाद्यपदार्थ, मार्गदर्शक सेवा, हस्तकला आणि इतर पर्यटनपूरक व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या उत्पन्नाचे नवे मार्ग निर्माण होऊ शकतात. निसर्गाने दिलेले हे वरदान पर्यटनाच्या शाश्वत विकासात रूपांतरित करण्याची गरज आहे.

## वाकडमध्ये विवाहितेच्या मृत्यूने खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

शिल्पा गवारे यांच्या मृत्यूप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा; हुंडा व मालमत्तेसाठी छळ केल्याचा माहेरच्यांचा आरोप

वाकड परिसरातील शिल्पा सचिन गवारे (वय ४२) या विवाहित महिलेच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे. शिल्पा यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आल्यानंतर त्यांच्या माहेरच्या कुटुंबीयांनी सासरच्या मंडळींवर हुंडा आणि मालमत्तेतील हिस्स्यासाठी मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी वाकड पोलिसांनी पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

शिल्पा यांचा विवाह २००९ मध्ये सचिन उत्तम गवारे यांच्याशी झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. शिल्पा यांच्या वडिलांच्या मालमत्तेतील हिस्सा मिळावा, यासाठी पती आणि सासरच्या मंडळींकडून त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्यांनी केला आहे. शिल्पा यांनी मालमत्तेसंदर्भातील दस्तऐवज आपल्या भावाच्या नावे स्वाक्षरी केल्यानंतर कथित छळ आणखी वाढल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

शिल्पा यांचे भाऊ संतोष गुलाब कलाटे यांनी वाकड पोलिसांकडे तक्रार दिली आहे. यापूर्वी कुटुंबीयांनी अनेकदा मध्यस्थी करून व आर्थिक मागण्या पूर्ण करून परिस्थिती सुरळीत करण्याचा प्रयत्न केला; मात्र कथित छळ थांबला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. बहिणीच्या मृत्यूनंतर संतोष कलाटे यांनी व्यक्त केलेला आक्रोश कुटुंबीयांच्या दुःखाची तीव्रता अधोरेखित करणारा ठरला.

या तक्रारीवरून वाकड पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील (इछड) कलम १०८, ८५ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सचिन उत्तम गवारे (पती), उत्तम गवारे (सासरे), संजीवनी गवारे (सासू) आणि संदीप गवारे (दीर) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, हा मृत्यू नेमक्या कोणत्या परिस्थितीत झाला, कथित छळ आणि मृत्यूचा संबंध काय आहे, तसेच तक्रारीतील आरोपांमध्ये कितपत तथ्य आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. उपलब्ध पुरावे, संबंधितांचे जबाब आणि घटनाक्रमाच्या आधारे सत्य समोर येणे अपेक्षित आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली वाकड पोलीस प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# जिल्हा परिषदेत वादाची ठिणगी; सदस्य-प्रशासन आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

मॉडेल स्कूलच्या कथित निकृष्ट कामांवरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही सदस्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची मुंबईत भेट घेऊन प्रशासनाच्या कारभाराबाबत गाऱ्हाणे मांडले. हे प्रकरण ताजे असतानाच मंगळवारी सायंकाळी विकासकामांच्या संदर्भात एका महिला सदस्येचा जिल्हा परिषदेतील वरिष्ठ अधिकाऱ्याशी वाद झाल्याने वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेचा सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी तीव्र निषेध केला असून प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा दिला आहे.

पुणेजिल्हा परिषद प्रशासनाच्या कारभाराबाबत यापूर्वीही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांनी जिल्हा परिषदेला सुमारे १ हजार ८४ कोटी रुपयांची थकबाकी भरण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर केडगाव येथील कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया मृत्यू प्रकरण, माहिती अधिकार प्रकरणात बसलेला दणका, अंतिम सेवाज्येष्ठता यादीतील नोंदींबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह आणि प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांमुळे तालुकास्तरीय कामकाजावर झालेला परिणाम आदी मुद्देही चर्चेत आहेत. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत मॉडेल स्कूल आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या प्रश्नावरून जोरदार रणकंदन झाले होते. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधीलच काही सदस्यांनी प्रशासनावर ठराविक ठेकेदारांना कामे दिल्याचा आरोप केला होता. त्यावेळी अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी मध्यस्थी करून वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही हा वाद कायम राहिला. मॉडेल स्कूलची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याची बाब काही सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. यासंदर्भात लेखी तक्रारीही करण्यात आल्या. मात्र, संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २५) जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल शिवले, करण खलाटे, विक्रम खुटवड, तुषार थोरात, गणेश बोत्रे यांच्यासह बांधकाम सभापती दिपाली हुलवळे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली. जिल्ह्यात सुरू असलेल्या कथित निकृष्ट कामांबाबत आणि प्रशासनाकडून सदस्यांना मिळत असलेल्या वागणुकीबाबत त्यांनी मंत्र्यांकडे कैफियत मांडली. यावर दोन्ही मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सदस्यांनी सांगितले. सदस्यांनी मंत्र्यांची भेट घेतल्याने जिल्हा परिषदेत आधीच तणावाचे वातावरण असताना मंगळवारी सायंकाळी एका महिला सदस्येचा विकासकामांवरून वरिष्ठ अधिकाऱ्याशी वाद झाला. चर्चे दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी उद्धट वर्तन केल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे. महिला सदस्येला विकासकामे दिली जाणार नाहीत, तसेच संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनाही तशा सूचना देण्यात येतील, असे सांगण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर सत्ताधारी आणि विरोधी सदस्य प्रशासनाविरोधात एकवटले आहेत. प्रशासनाकडून सदस्यांना सहकार्य मिळत नसून चुकीच्या कामांना मात्र पाठबळ दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाची उपमुख्यमंत्री व ग्रामविकासमंत्र्यांकडे लेखी तक्रार करण्यात येणार असल्याचे सदस्यांनी सांगितले.

दोन मंत्र्यांनी घेतली गंभीर दखल

मंगळवारी मुंबईत भेटी झाल्यानंतर बुधवारी पुण्यामध्ये पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे जिजाऊ निवासस्थानी तर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे बावधन येथील एका हॉटेलमध्ये स्वतंत्र दोन बैठका पुणे जिल्हा परिषद संदर्भातील तक्रारींच्या विषयावर झाल्या. जिल्हा परिषदेच्या कारभारावर या दोन्ही बैठकांमध्ये चर्चा झाली. स्मार्ट स्कूल, स्मार्ट पीएससी एकाच ठेकेदाराला ९० कोटी रुपयांची कामे देण्यामागचे गुपित, टेंडर क्लबिंग यांसह अन्य विषयावर गांभीर्याने चर्चा झाली असून दोन्ही मंत्र्यांनी चौकशीचे संकेत देण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### धरण तुडुंब, तरी भोरकरांची हंडाभर पाण्यासाठी वणवण; महिला संतप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र
भोर : प्रतिनिधी

भोर शहराला पाणीपुरवठा करणारे भाटघर धरण १०० टक्के भरले आहे मात्र तरीही मागील तीन महिन्यापासून भोर शहरात दिवसाआड, कमी दाबाने आणि गाळमिश्रित पाणीपुरवठा केला जात आहे. धरण उशाला कोरड घशाला अशा अवस्था भोर शहरातील नागरिकांची झाली आहे.निवडणुकीत चोवीस तास पाणी देण्याचे आश्वासन देणाऱ्यांनी तासभर तरी स्वच्छ पाणी द्या अशी मागणी शहरातील संतप्त नागरिकांनी केली आहे.

भर पावसाळ्यात धरणे तुडुंब भरली असतानाही भोर शहराला मात्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. भोर शहराला पाणीपुरवठा करणारे भाटघर धरण १०० टक्के भरले असूनही भोर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांमध्ये नगरपरिषद प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी पसरली आहे. विशेषतः महिला वर्गात संतापाचे वातावरण असून पाण्याची परिस्थिती अशी राहिल्यास नगरपालिकेवर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

निवडणुकीच्या काळात २४ तास पाणी देऊ असे आश्वासन देणारे लोकप्रतिनिधी आता या गंभीर विषयाकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. पावसाळ्यातही दिवसाआड अत्यंत अनियमित पाणीपुरवठा होत आहे.कधी दिवसाआड,कधी दोन दिवसांनी तर कधी आले तरी फक्त १० ते १५ मिनिटे किंवा अर्धा तासच पाणी येते अचानक सकाळी वीज पुरवठा खंडित झाल्यास तीन दिवस पाणीपुरवठा खंडित होतो त्यातही येणारे पाणी अशुद्ध आणि गढूळ असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# नेपाळमध्ये महाप्रलय! २८८ भारतीय अजूनही बेपत्ता; भारताकडून मदतीचा हात

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

नेपाळमध्ये २६ ऑगस्ट २०२६ रोजी आलेल्या भीषण अचानक पुरामुळे मोठी हानी झाली असून, या आपत्तीनंतर किमान २८८ भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता असल्याची माहिती भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हणजेच परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने, गुरुवारी २७ ऑगस्ट रोजी दिली. बेपत्ता भारतीयांमध्ये जलविद्युत प्रकल्पांवर काम करणारे कर्मचारी, पर्यटक तसेच कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या भाविकांचा समावेश आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, भारताचे सध्या मुख्य लक्ष नेपाळ सरकारच्या विनंतीनुसार मानवतावादी मदत आणि बचावकार्याला पाठबळ देण्यावर आहे. भारताने आतापर्यंत ४७ टनांहून अधिक आपत्कालीन मदत साहित्य नेपाळला पाठवले आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानांमधून औषधे, अन्नपदार्थ आणि इतर आवश्यक साहित्य काठमांडूकडे रवाना करण्यात आले आहे.

बेपत्ता असलेल्या २८८ भारतीयांमध्ये त्रिशूली-१ जलविद्युत प्रकल्पावर काम करणारे ७३ भारतीय आहेत. याशिवाय तामिळनाडूतील कैलास मानसरोवर यात्रेचे दोन गट, पश्चिम बंगालमधील ३२ जणांचा गट, विविध राज्यांतील ६१ जण आणि केरळमधील ३३ जणांचा गट यांचा समावेश असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, तामिळनाडूतील २१ भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली असून, त्यांना सुरक्षितपणे भारतात आणण्याची व्यवस्था सुरू आहे.



या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारत बेली पूल उपलब्ध करून देण्याच्या तयारीत आहे. पूरामुळे रस्ते आणि पूल उद्ध्वस्त झाल्याने बचावकार्य आणि संपर्कव्यवस्था मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे. बेली पूल हे पूर्वनिर्मित आणि तात्पुरते पूल असून, आपत्तीग्रस्त भागातील वाहतूक पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जाऊ शकतो. मात्र, नेपाळकडून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल किंवा भारतीय लष्कराच्या अभियांत्रिकी दलाची तैनाती करण्याची मागणी आल्याची माहिती सध्या परराष्ट्र मंत्रालयाकडे नसल्याचे रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नेपाळमधील या महापुरात मृतांचा आकडा मोठ्या प्रमाणावर वाढला असून, शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. हिमालयीन भागातील बर्फ आणि खडकांचे मोठे ढिगारे कोसळल्यामुळे हा महापूर निर्माण झाल्याचे प्राथमिक अहवाल सांगतात. रस्ते, पूल, गावे आणि वीज प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले असून, बचाव पथकांसमोर दुर्गम भौगोलिक परिस्थिती हे मोठे आव्हान ठरत आहे.

भारताने नेपाळसोबत समन्वय कायम ठेवत मदतकार्याला प्राधान्य दिले आहे. भारत-नेपाळ सीमेच्या दिशेने पुराचा परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन बिहार आणि उत्तर प्रदेशातील प्रशासनालाही सतर्क करण्यात आले आहे.

आता सर्वात मोठा प्रश्न आहे तो बेपत्ता असलेल्या २८८ भारतीयांचा शोध घेण्याचा. या नागरिकांच्या कुटुंबीयांच्या नजरा सरकारच्या प्रत्येक अद्ययावत माहितीकडे लागल्या आहेत. नेपाळमधील दुर्गम भागात सुरू असलेल्या शोध आणि बचाव मोहिमेतून या नागरिकांबाबत लवकरात लवकर सकारात्मक माहिती मिळावी, अशीच त्यांच्या कुटुंबीयांची अपेक्षा आहे.

## नव्या स्वयंपाकाच्या गॅस जोडणीवर सरकारचा 'तात्पुरता' ब्रेक; ग्राहकांच्या प्रतीक्षेचा अंत कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशभरात स्वयंपाकाच्या गॅसची नवीन जोडणी मिळवण्यासाठी अर्ज केलेल्या ग्राहकांची प्रतीक्षा अद्याप संपलेली नाही. पश्चिम आशियातील संघर्षामुळे गॅसच्या पुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याचे कारण देत १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरची नवीन जोडणी देण्यावर अजूनही मर्यादा कायम आहेत. पेट्रोलियम मंत्रालयाकडून हा निर्णय 'तात्पुरता' असल्याचे सांगितले जात असले, तरी मार्चपासून अर्ज करून बसलेल्या ग्राहकांसाठी ही प्रतीक्षा आता गंभीर प्रश्न बनली आहे.

नवी दिल्ली, मुंबई, कोलकाता, बंगळुरू आणि चेन्नईसह देशातील अनेक शहरांमधील गॅस वितरकांनी मार्चच्या मध्यापासून १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरसाठी नवीन जोडणी दिलेली नाही. म्हणजेच, ज्यांनी नियमाप्रमाणे अर्ज केला, आवश्यक कागदपत्रे सादर केली आणि गॅस जोडणीची अपेक्षा ठेवली, त्यांना अनेक महिन्यांनंतरही सिलिंडर मिळालेला नाही. सरकार यामागे 'भूराजकीय परिस्थिती' असल्याचे सांगत असले, तरी सामान्य ग्राहकांसमोर प्रश्न साधा आहे घरातील स्वयंपाकासाठी लागणारा गॅस मिळवण्यासाठी एवढी दीर्घ प्रतीक्षा का?

दरम्यान, गॅस वितरकांकडून पाच किलोचे मुक्त व्यापारासाठी उपलब्ध सिलिंडर आणि दहा किलोचे संयुक्त साहित्यापासून बनवलेले सिलिंडर पर्याय म्हणून सुचवले जात आहेत. मात्र हे पर्याय प्रत्येक कुटुंबाच्या गरजा आणि आर्थिक परिस्थितीला कितपत योग्य आहेत, हा स्वतंत्र प्रश्न आहे. नियमित १४.२ किलोचा घरगुती सिलिंडर न मिळाल्याने ग्राहकांना पर्यायी व्यवस्थेकडे वळावे लागत आहे.

## परिसीमनावर काँग्रेसचा सरकारला घेराव; सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी, ५४३ जागांवर ठाम भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोटा : प्रतिनिधी ।

लोकसभा मतदारसंघांच्या परिसीमनाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय केंद्रस्थानी आला असून, काँग्रेसने केंद्र सरकारवर दबाव वाढवण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी, २७ ऑगस्ट २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून परिसीमनाच्या प्रश्नावर सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली. विशेष अधिवेशनाच्या माध्यमातून सरकार परिसीमन कायद्यात पुढील बदल करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर खरगे यांनी ही मागणी केली आहे.

खरगे यांनी पत्र सार्वजनिक करत सरकारने या विषयावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करावी, अशी भूमिका मांडली. त्यांच्या मते, परिसीमन हा केवळ एका पक्षाचा किंवा सरकारचा विषय नसून, त्याचा थेट परिणाम देशातील राजकीय प्रतिनिधित्व, राज्यांचे लोकसभेतील स्थान आणि संसदीय संतुलनावर होणार आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत सर्वपक्षीय सहमती आणि पारदर्शक चर्चा आवश्यक असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

काँग्रेसने लोकसभेतील विद्यमान ५४३ जागांची संख्या वाढवण्याच्या कोणत्याही निर्णयाला विरोध असल्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली आहे. लोकसंख्येच्या आधारावर जागांचे पुनर्वाटप झाल्यास ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणात चांगली कामगिरी केली, त्या राज्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वावर परिणाम होण्याची शक्यता काँग्रेसकडून व्यक्त केली जात आहे. याचवेळी काँग्रेसने महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दाही पुन्हा पुढे आणला आहे. २०२९च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना आरक्षण लागू झाले पाहिजे, अशी पक्षाची मागणी आहे. त्यामुळे परिसीमन आणि महिला आरक्षण हे दोन्ही मुद्दे एकत्रितपणे हाताळण्याची मागणी काँग्रेसकडून होत आहे.

सरकार विशेष अधिवेशन बोलावणार का, परिसीमनाबाबत नेमकी कोणती दिशा स्वीकारणार आणि २०२९च्या निवडणुकीपूर्वी महिला आरक्षण लागू होणार का, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. परिसीमनाच्या मुद्द्यावर सरकार आणि विरोधकांमधील संघर्ष आगामी काळात आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## पॅकेटवर इशारा नको, उद्योगांची 'सल्लामसलत' हवी? नेस्लेच्या भूमिकेने अन्नसुरक्षेवर नवा प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

भारतात पॅकेटबंद अन्नपदार्थांवर आरोग्यविषयक इशारे असावेत की नाही, यावर चर्चा सुरू असतानाच नेस्लेने सरकारच्या नियमांमध्ये उद्योगांचीही सल्लामसलत असावी, अशी मागणी केली आहे. नियम वैज्ञानिक पद्धतीने तयार व्हावेत, यासाठी अन्नउद्योगाशी चर्चा करण्याची गरज असल्याचे कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने म्हटले आहे. मात्र, या भूमिकेमुळे एक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे आरोग्यविषयक नियम ठरवताना अंतिम प्राधान्य ग्राहकांच्या आरोग्याला असणार की अन्नउद्योगाच्या हिताला?

पॅकेटबंद अन्नपदार्थांमधील जास्त साखर, मीठ आणि चरबी याबाबत जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत ग्राहकांना उत्पादनाच्या पॅकेटवरच स्पष्ट आणि सहज समजणारी माहिती मिळणे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येक ग्राहकाकडे उत्पादनातील गुंतागुंतीची माहिती वाचून त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी वेळ किंवा तज्ज्ञता असेलच असे नाही.

भारत सरकारने गेल्या काही वर्षांपासून पॅकेटच्या पुढील बाजूवर आरोग्यविषयक इशारे देण्याच्या काही प्रस्तावांवर काम केले. मात्र, रॉयटर्सच्या वृत्तानुसार, कोका-कोला आणि नेस्लेसारख्या कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या उद्योग संघटनांनी मार्चमध्ये या उपाययोजनांना विरोध केला. त्यानंतर प्रस्ताव मागे पडल्याचे वृत्त समोर आले.

यामुळेच आता नेस्लेची 'सल्लामसलत' करण्याची मागणी अधिक गंभीर ठरते. उद्योगाशी चर्चा करणे चुकीचे नाही; मात्र नियम तयार करण्याची प्रक्रिया उद्योगाच्या प्रभावाखाली जाणार नाही, याची हमी कोण देणार? आरोग्याचे निकष ठरवताना ग्राहकांच्या हितापेक्षा कंपन्यांच्या व्यावसायिक सोयीला महत्त्व मिळाले, तर त्याचा थेट परिणाम सार्वजनिक आरोग्यावर होऊ शकतो.

पॅकेटवर काय लिहायचे, हे ठरवण्याचा अधिकार उद्योगांना हवा की ग्राहकांना सत्य कळण्याचा अधिकार हवा? हा प्रश्न आता केवळ नेस्लेपुरता राहिलेला नाही; तो भारताच्या अन्ननियमन व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडला गेला आहे. .

## खांद्यावरचा हात 'लैंगिक' नाही, पण स्त्रीची लाज मात्र जागी? न्यायाच्या या भाषेवर प्रश्नचिन्ह!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

स्त्रीच्या खांद्याला पकडणे, तो दाबणे आणि तिला झटकून बाजूला ढकलणे या कृतीमुळे तिचा अपमान होतो, तिला लाज वाटते, तिच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो; पण त्यामध्ये लैंगिक हेतू दिसत नसेल तर तो प्रकार 'लैंगिक छळ' ठरत नाही! मुंबई उच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने पुन्हा एकदा कायदा, स्त्रीची सुरक्षितता आणि आपल्या न्यायव्यवस्थेच्या भाषेकडे पाहण्याची गरज निर्माण केली आहे. न्यायमूर्ती अभय मंत्री यांनी गिरिश निंगोंडा पाटील यांच्या प्रकरणात एफआयआरमधील कलम ३५४-अ अर्थात लैंगिक छळाचा आरोप रद्द केला; मात्र कलम ३२३, ३५३ आणि ३५४ अंतर्गत कारवाई कायम ठेवली.

प्रकरण नेमकं काय? तक्रारदार महिला ग्रामपंचायत कार्यालयात ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून काम करत असताना आरोपी कार्यालयात घुसला, तिच्याशी वाद घातला, मंजुरीचा आदेश हिसकावून फाडला आणि त्यानंतर तिचा उजवा खांदा पकडून दाबला आणि तिला बाजूला ढकलले. या घटनेमुळे महिलेला लाज आणि अपमानाची भावना झाली. प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांनीही तिच्या कथनाला प्राथमिक आधार मिळत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने स्पष्ट केले की या कृतीत सार्वजनिक सेवकाला कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यासाठी मारहाण किंवा बळाचा वापर आणि महिलेच्या विनयभंगाचे घटक दिसतात; मात्र लैंगिक हेतू, लैंगिक स्वरूपाचे अवांछित संकेत किंवा लैंगिक मागणी असल्याचे प्रथमदर्शनी दिसत नसल्याने कलम ३५४-अ लागू होत नाही.

कायद्याच्या चौकटीत हा फरक समजून घेणे आवश्यक आहे. पण प्रश्न इथेच संपत नाही; उलट इथूनच सुरू होतो. कारण समाज स्त्रीला आधीपासूनच 'तुझी लाज तू जप', 'तू कसं वागलीस हे महत्त्वाचं', 'तू कुठे होतीस', 'तू काय घातलं होतंस' अशा प्रश्नांच्या ओझ्याखाली ठेवतो. आणि आता एखाद्या पुरुषाने तिच्या शरीरावर जबरदस्तीने हात ठेवला, तिला दाबले, ढकलले, तिचा अपमान केला, तरी त्या कृतीला 'लैंगिक हेतू नव्हता' या चौकटीतून वेगळं करण्याची गरज भासते, तेव्हा अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतोस्त्रीच्या शरीरावर तिची परवानगी नसताना हात ठेवण्याच्या कृतीकडे आपण नेमकं कोणत्या नजरेने पाहतो?

हा निर्णय म्हणजे न्यायालय स्त्रियांच्या विरोधात आहे, असा सरसकट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. न्यायालयाने उलट कलम ३५४ अंतर्गत विनयभंगाचा आरोप कायम ठेवला आहे. मात्र न्यायालयीन भाषेचा आणि कायद्याच्या वापराचा सामाजिक परिणाम काय होतो, यावर प्रश्न उपस्थित करणे नक्कीच आवश्यक आहे. कारण स्त्रीला असुरक्षित वाटण्यासाठी प्रत्येक वेळी 'लैंगिक हेतू' सिद्ध व्हायलाच हवा का? तिच्या इच्छेविरुद्ध शरीराला स्पर्श, दडपशाही, धक्काबुक्की आणि सार्वजनिक अपमान यांना गांभीर्याने पाहण्याची सामाजिक संवेदनशीलता कायद्याइतकीच महत्त्वाची आहे.

विडंबना अशी की स्त्रीला सुरक्षित ठेवण्यासाठी कायदे वाढत गेले, पण तिच्या अनुभवावर विश्वास ठेवण्याची मानसिकता अजूनही तितकीच मागे आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबई उच्च न्यायालयाने लैंगिक छळाच्या तक्रारीत 'लैंगिक घटक नाही' असे प्राथमिक म्हणत चौकशी न करता तक्रार नाकारण्याच्या प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित केला होता.

म्हणून प्रश्न केवळ एका खांद्याचा नाही. प्रश्न आहे त्या मानसिकतेचा, जिथे स्त्रीच्या शरीरावरचा अनधिकृत स्पर्श आधी 'किती लैंगिक होता?' या काट्यावर मोजला जातो आणि तिचा अपमान नंतर विचारात घेतला जातो. स्त्रीला प्रत्येक वेळी स्वतःची लाज, भीती आणि अपमान सिद्ध करण्याची परीक्षा द्यावी लागणार असेल, तर सुरक्षिततेचे आश्वासन नेमके कोणासाठी आहे? न्यायालयाने कायद्याची चौकट पाळावीच; पण त्या चौकटीच्या पलीकडे समाजाला स्त्रीच्या स्वातंत्र्याची आणि संमतीची भाषा शिकवण्याची जबाबदारीही तितकीच मोठी आहे.

## १६२ वर्षांची प्रतीक्षा संपली! पश्चिम भारतातील अधिवक्त्यांच्या संघटनेच्या अध्यक्षपदी आता महिला; समानतेच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

न्यायव्यवस्थेच्या दालनात समानतेची भाषा बोलणे सोपे आहे; पण त्या समानतेला संस्थांच्या सर्वोच्च नेतृत्वात प्रत्यक्ष स्थान देणे ही खरी कसोटी असते. मुंबई उच्च न्यायालयातील वकिलांची १६२ वर्षे जुनी संस्था असलेल्या पश्चिम भारत अधिवक्ता संघटनेने याच कसोटीवर इतिहास घडवणारा निर्णय घेतला आहे. १८६४ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेच्या इतिहासात पहिल्यांदाच अध्यक्षपद महिलेसाठी राखीव करण्यात आले आहे. पुढील निवडणुकीपासून या संस्थेच्या सर्वोच्च पदावर महिला अधिवक्ता विराजमान होणार आहे.

२७ ऑगस्ट २०२६ रोजी समोर आलेल्या या निर्णयानुसार संघटनेच्या संविधान आणि नियमांमध्ये सर्वानुमते बदल करण्यात आला आहे. या बदलामुळे कार्यकारी मंडळातील सर्वोच्च पद असलेले अध्यक्षपद आता महिलांसाठी राखीव राहणार आहे. संघटनेच्या अधिकृत निवेदनानुसार, दर तीन कार्यकाळांपैकी एकदा अध्यक्षपद महिला सदस्याकडे जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे हा केवळ एकदाचा प्रतीकात्मक निर्णय नाही; महिलांना संस्थेच्या नेतृत्वात सातत्याने आणि संरचनात्मक पद्धतीने स्थान देण्याचा हा प्रयत्न आहे.

आणि याच ठिकाणी या निर्णयाचे महत्त्व अधिक मोठे होते. कारण १६२ वर्षांच्या इतिहासात या संघटनेला एकदाही महिला अध्यक्ष मिळाली नव्हती. न्यायालयात महिलांच्या अधिकारांसाठी युक्तिवाद करणाऱ्या महिला अधिवक्त्या असंख्य आहेत. न्यायालयीन निर्णयांमध्ये लैंगिक समानता, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य याबाबत चर्चा होते. पण स्वतःच्या व्यावसायिक संस्थांच्या सर्वोच्च नेतृत्वात महिलांना समान संधी किती मिळते, हा प्रश्न मात्र कायम राहिला. आता या संघटनेने या विसंगतीवर थेट प्रहार केला आहे.

ज्येष्ठ अधिवक्ता दीपा चव्हाण यांनी या निर्णयाचे स्वागत करताना हा समानतेच्या दिशेने मोठा आणि ऐतिहासिक टप्पा असल्याचे म्हटले आहे. संघटनेच्या सदस्यांमध्ये महिलांचे प्रमाण अजूनही असमतोल असल्याच्या पार्श्वभूमीवर नेतृत्वासाठी आरक्षण देणे हा महिलांच्या सहभागाला बळ देणारा निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या मते, १६२ वर्षांनंतर महिला अध्यक्ष होणे ही केवळ पद मिळण्याची बाब नाही, तर न्यायविश्वातील समानतेच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे.

विशेष म्हणजे हा निर्णय अचानक झालेला नाही. ९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या संघटनेच्या विशेष सर्वसाधारण सभेत संविधान दुरुस्ती समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचे अध्यक्ष संघटनेचे विद्यमान अध्यक्ष प्रशांत रेळेकर होते. महिलांचा कार्यकारी मंडळातील आणि संस्थेच्या नेतृत्वातील सहभाग वाढवण्यासाठी संविधान आणि नियमांमध्ये कोणते बदल करावेत, याबाबत या समितीने अहवाल सादर केला. त्यानंतर संविधानात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. संघटनेच्या अधिकृत निवेदनात हा निर्णय 'ऐतिहासिक आणि खूप आधी व्हायला हवा होता असा बदल' असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामध्येच या बदलाचे महत्त्व दडलेले आहे. कारण महिलांना नेतृत्वाची संधी देणे ही कोणाचीही मेहरबानी नाही; समान पात्रता असताना संधी न मिळणे हीच खरी विसंगती आहे. त्यामुळे महिलांसाठी अध्यक्षपद राखीव करण्याचा निर्णय हा महिलांना पुढे आणण्याचा कृत्रिम प्रयत्न नसून, १६२ वर्षांच्या असमतोलाची दुरुस्ती म्हणून पाहायला हवा.

दीपा चव्हाण यांनी २०१८ मध्येच संघटनेने महिलांच्या प्रतिनिधित्वासाठी काही पदे राखीव करण्याच्या दिशेने पाऊल उचलले होते, असेही नमूद केले. मात्र अध्यक्षपदासारख्या सर्वोच्च स्थानासाठी आता करण्यात आलेला बदल अधिक निर्णायक आहे.

न्यायालयीन क्षेत्रात महिला न्यायाधीश, महिला अधिवक्त्या आणि महिला कायदेपंडितांची संख्या वाढत असताना नेतृत्वाच्या खुर्च्यांवरही महिलांचा समान हक्क असणे आवश्यक आहे. कारण समानतेची खरी परीक्षा व्यासपीठावर महिलांचा आवाज किती मोठा आहे यात नाही; तर निर्णय घेणाऱ्या टेबलावर त्यांच्यासाठी खुर्ची आहे की नाही, यात आहे.

पश्चिम भारत अधिवक्ता संघटनेचा हा निर्णय म्हणूनच केवळ एका वकिलांच्या संघटनेच्या घटनादुरुस्तीचा निर्णय नाही. तो न्यायासाठी लढणाऱ्या महिलांना दिलेला स्पष्ट संदेश आहेइतिहास कितीही जुना असो, नेतृत्वावर पुरुषांची मक्तेदारी कायमची असण्याची गरज नाही. १६२ वर्षांची परंपरा बदलू शकते, आणि त्या बदलाची सुरुवात न्यायविश्वातूनच होऊ शकते.